**श्री. रामदास चव्हाण,** अपील प्राधिकारी तथा
मुख्य समाज विकास अधिकारी
खात्याचे नांव व पत्ता :–समाज विकास विभाग,
पुणे महानगरपालिका
शिवाजीनगर,पुणे–५
दूरध्वनी क्रमांक :–२५५०१२८१
कार्यालयीन वेळ :– स.९.४५ ते सायंकाळी ६.१५
खात्याचा ई–मेल :– sdd@punecorporation.org
जावक क्रमांक :– सविवि/ 2975
दिनांक :– 24/12/2025

अपील प्राधिकारी तथा मुख्य समाज विकास अधिकारी यांचे कार्यालय
पुणे महानगरपालिका.

अपील क्रमांक :- पुणे मनपा/अ.प्रा.तथा अपील प्राधिकारी/अपील क्र. १९ /२०२५
ऑन लाईन अपिल क्र. PUMCO/A/2025/60415

अपिलार्थी नांव व पत्ता :-
श्री. राजेश गायकवाड
द्वारा- श्री. शाम साधू ससाणे
रा. स.नं. ११० रामटेकडी, प्रथमा बी रामटेकडी हडपसर,पुणे -४११०१३
मो.नं. 9370144086

जन माहिती अधिकाऱ्याचे नांव व हुद्दा :-
**श्री. असंग पाटील,**
उप समाज विकास अधिकारी,
समाज विकास विभाग,
पुणे महानगरपालिका.

श्री. राजेश गायकवाड व इतर दोन --- अपिलार्थी

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा उप समाज विकास अधिकारी,पुणे महानगरपालिका
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये अपील

अपिलकर्ता यांनी ऑन लाईन अर्ज क्र. PUMCO/R/2025/62199 दिनांक २९/९/२०२५ रोजी जन माहिती अधिकारी तथा उप समाज विकास अधिकारी, पुणे महानगरपालिका यांचेकडे अर्ज करुन मागणी केलेली माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली माहिती व इतर पत्रव्यवहारासंबधीची माहिती :-

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| माहिती अधिकारांतर्गत अर्ज सादर केल्याचा दिनांक | माहिती उपलब्ध करुन द्यावयाचा अंतिम दिनांक | अपिलार्थीस उत्तर पाठविल्याचा दिनांक | अर्जदाराने शुल्क भरल्याचा दिनांक | अर्जदारास माहिती दिल्याचा दिनांक |
| २९/९/२०२५ | २८/१०/२०२५ | १६/१०/२०२५ | - | - |

प्रथम अपील अर्ज दाखल करण्याचे कारण :- अर्जदाराचे दिनांक २९/९/२०२५ रोजीच्या अर्जाप्रमाणे त्यांना दिलेल्या माहिती अपुर्ण असल्याने प्रथम अपील अर्ज दाखल करण्यात आला आहे.

| प्रथम अपील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रथम अपील दाखल करावयाचा अंतिम दिनांक | प्रथम अपील अर्ज दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपील अर्ज मुदतीत दाखल केला आहे का ? | प्रथम अपिलाच्या विलंबाबबत निवेदन दिले आहे का ? | प्रथम अपील सुनावणी सूचना पाठविल्याचा दिनांक |
| १५/११/२०२५ | २८/११/२०२५ | नाही | नाही | ९/१२/२०२५ |

**<u>प्रथम अपील सुनावणी दिनांक व वेळ :-</u>** दिनांक १६/१२/२०२५, सकाळी ११.३० वाजता.

**<u>सुनावणीस अपिलकर्ता उपस्थित/अनुपस्थित :-</u>** दिनांक १६/१२/२०२५रोजीच्या सुनावणीस अपिलकर्ता हे स्वत: उपस्थित होते.

**<u>सुनावणीस जन माहिती अधिकारी उपस्थित/अनुपस्थित :-</u>** दिनांक १६/१२/२०२५रोजीच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

**जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या उत्तराचा/माहितीचा तपशील :-**

| अ.क्र. | अर्जदाराने मागितलेली माहिती | जन माहिती अधिकायाने दिलेले उत्तर/माहिती |
|---|---|---|
| 1 | पुणे महानगरपालिका समाज विकास विभाग पूर्वीचे नाव नागरवस्ती विकास योजना याद्वारे शासनाचे लोकसेवा केंद्र स्थापन झाल्यानंतर या लोकसेवा केंद्रांचे स्मार्ट सेवा सहकारी संस्था स्थापन करण्याबाबतची धोरणाच्या प्रती देण्यात याव्यात | संदर्भान्वये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत माहिती मिळविणेकरीत आपला ऑन लाईन अर्ज PUMCO/R/2025/62199 अन्वये समाज विकास विभागाकडे प्राप्त झाला आहे. सदर आर्जन्वये आपण मागणी केलेली समाज विकास विभागाकडील उपलब्ध माहिती सोबत जोडून पाठवित आहे. |

"विवेचन"

सदर बाबत अपिलार्थी यांनी सांगितले की, माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत माहिती उपलब्ध करून न दिल्याने अपिल क्र. PUMCO/A/2025/60415, दि.१५/११/२०२५ रोजी प्रथम अपिल दाखल केले आहे. त्याअनुषंगे उप समाज विकास अधिकारी तथा जन माहिती अधिकारी यांनी सदरची माहिती दि.१७/१०/२०२५ रोजी आपले ई-मेल आयडीवर पाठविणेत आली असलेबाबत सांगितले.

अपिलार्थी यांनी त्यांचा ईमेल चेक न केल्याने त्यांना माहिती मिळाली नाही त्यामुळे खात्याने अद्याप माहिती दिली नाही असा समज झाल्याचे अपिलार्थी यांनी म्हणणे व्यक्त केले आहे.

"आदेश"

सदर अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या अपिल अर्जाच्या अनुषंगाने दि.१७/१०/२०२५ रोजी त्यांच्या ई-मेल आयडीवर माहिती देणेत आलेली आहे.

तरी अपिलीर्थीस सदर माहितीच्या पानांच्या प्रती पुनःश्च उपलब्ध करून द्याव्या. सदर माहिती अपिलार्थी यांचे समाधान झाल्याने सदरचे अपिल निरस्त करणेत येत आहे.

(रामदास चव्हाण)
अपील प्राधिकारी तथा
मुख्य समाजविकास अधिकारी
समाज विकास विभाग
पुणे महानगरपालिका

दिनांक :-
ठिकाण :- पुणे.
टीप :-

१) सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास ९० दिवसाच्या मुदतीत मा.आयुक्त,राज्य माहिती आयोग,पुणे खंडपीठ,पुणे,नवीन प्रशासकीय इमारत,४ था मजला,पुणे-१ यांचेकडे द्वितीय अपील करण्याबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार तरतूद आहे.
२) या आदेशाची प्रत पुणे मनपाच्या www.punecorporation.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

प्रत :-

१) जन माहिती अधिकारी तथा उप समाज विकास अधिकारी, समाज विकास विभाग, पुणे महानगरपालिका

२) सहाय्यक जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, समाज विकास विभाग, पुणे महानगरपालिका

३) सहाय्यक जन माहिती अधिकारी तथा उप अधिक्षक, समाज विकास विभाग, पुणे महानगरपालिका

४) श्री. शाम साधू ससाणे, रा. स.नं. ११० रामटेकडी, प्रथमा बी रामटेकडी हडपसर,पुणे -४११०१३

यांजकडे पुढील जरूर त्या कार्यवाहीसाठी व माहितीसाठी